महाराष्ट्र शासन
निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण विभाग,
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत ,पुणे-४११००१
ई-मेल -ddaseed@gmail.com

जा.क्र गुनि १/२/केवाय/बियाणे/२६-२७/ र- ~~२८८~~/२०२६ ३७६ | दिनांक:- ~~१३~~/०५/२०२६ २५

प्रति,

१. संशोधन संचालक, म.फु.कृ.वि. राहुरी
२. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला
३. विभागीय कृषी सहसंचालक, (सर्व)
४. विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, पुणे
५. महाव्यवस्थापक (उत्पादन), महाबीज, अकोला
६. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (सर्व)
७. जिल्हा बीज प्रमाणीकरण अधिकारी (सर्व)

**विषय:** कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत बियाणे घटकातील (पुर्वीची एसएमएसपी) उपघटकांच्या अंमलबजावणी मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत...

**संदर्भ:** १. ४२ व्या SLSC मिटिंग चे इतिवृत्त No. CSS-२०२६/C.R.१९/२-A, दि.११/०३/२०२६.

२. केंद्र शासनाचे पत्र F.O. No. ०३-/१४/२०२६-KY (FTS:१८६५५७), दि.२२/०४/२०२६

३. केंद्र शासनाचे पत्र क्र. २-३३/२०२४-NFSNM दिनांक १६/०४/२०२५

४. शासन निर्णय क्र.कृवपदुम/१२०२७/४४/२०२६-MAG/१ए (E-१६४२२४०) दि.-११ मे २०२६

५. विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम,पुणे यांचे पत्र क्र.Prodn ४(२) /NSC-PNA/२०२६ , दि.८/०५/२०२६

शेतकऱ्यांना उच्चतम प्रतीचे बियाणे वेळेवर आणि माफक दरात उपलब्ध करून देण्याचे उद्देशाने बाराव्या पंचवार्षिक योजनेदरम्यान राष्ट्रीय कृषी विस्तार व तंत्रज्ञान मिशन (NMAET) अंतर्गत "बियाणे व लागवड साहित्य उपअभियान (SMSP)" सुरू करण्यात आले. सदर उपअभियानाची अंमलबजावणी सन २०१४-१५ पासून सुरू झालेली आहे.

केंद्र शासनाच्या वित्तीय व्यय समितीच्या (EFC) शिफारसीनुसार, SMSP मधील सर्व उपघटक "कृषी उन्नती योजने" अंतर्गत "राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (NFSM)" मध्ये विलीन करण्यात आलेले असून

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान (NFSM) चे नाव बदलून "राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान (NFSNM)" असे करण्यात आले आहे.

संदर्भ क्र १ अन्वये ४२ व्या राज्यस्तरीय मंजुरी समितीच्या दि.१०.०३.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानातील बियाणे घटकासाठी सन २०२६-२७ साठी रु.२३११.३२ लाख इतक्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. केंद्र शासनाने संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान -बियाणे घटकासाठी (NFSNM-Seed Components) सन २०२५-२६ च्या प्रलंबित दायित्व (रु.२१२.३१ लाख) रकमेसहीत एकूण रु.२४९४.९४ लाख रकमेच्या वार्षिक कृषी आराखड्यास मान्यता प्रदान केलेली आहे.संदर्भ क्र. ३ अन्वये केंद्र शासनाने बियाणे घटकातील उपघटकांची अंमलबजावणी करण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. संदर्भ क्र. ४ चे शासन निर्णयाद्वारे कृषी उन्नती योजनेंतर्गत बियाणे घटकाखालील उपघटकांच्या रु.२४९४.९४ लाख रकमेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

कृषी उन्नती योजनेंतर्गत बियाणे घटकात समावेश असलेल्या सर्व उपघटकांची भौतिक उद्दिष्टे व आर्थिक मापदंड तसेच सदर उपघटकांची अंमलबजावणी करणेबाबतच्या कार्यपद्धतीचा समावेश करून सविस्तर मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

**१. बियाण्यांच्या नवीन जातींना प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य (Assistance for fostering seeds of new varieties) (१०० % केंद्र हिस्सा):-**

बियाणे हा पिकांचे उत्पादन व उत्पादनक्षमतेवर प्रभाव टाकणारा अत्यावश्यक घटक असून, देशाची अन्नसुरक्षा सुनिच्छित करणे व भरघोस उत्पादनासाठी उच्चतम प्रतीचे बियाणे उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. केवळ चांगल्या प्रतीच्या बियाण्यांमुळेच पिकांच्या उत्पादकतेत १५-२०% पर्यंत वाढ होऊ शकते. भारतासारख्या देशात अजूनही बरेच शेतकरी स्वतः जतन केलेले बियाणे वापरत आहेत. शेतकऱ्यांच्या अशा बियाणांची गुणवत्ता सुधारण्यासाठी विभागाने पूर्वीच्या एसएमएसपी अंतर्गत " ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम" हा घटक महाबीजच्या माध्यमातून राबविला आहे. तसेच प्रमाणित बियाणांचे उत्पादन वाढवण्यासाठी "ग्राम बिजोत्पादन कार्यक्रमातून प्रमाणित बियाणे उत्पादन" या घटकाची अंमलबजावणी केली आहे.

बियाणे बदल दर (SRR) व वाण बदल दरात (VRR) वृद्धी करण्यासाठी, त्याचबरोबर ICAR , SAUs, CAUs इत्यादी संस्थांनी विकसित केलेल्या उच्च उत्पादक, पोषणदृष्ट्या समृद्ध व हवामान प्रतिरोधक नव्या वाणांचा प्रसार गतीने व्हावा आणि जुन्या वाणांचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करणे व नव्या वाणांचा बियाणे साखळीत समावेश होण्याच्या उद्देशाने “बियाण्यांच्या नवीन जातींना प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य” या उपघटकांतर्गत आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**अर्थसहाय्याचे घटक व अंमलबजावणीची कार्यपद्धती:**

**१.१ पायाभूत बियाणांवर अर्थसहाय्य (Assistance on Foundation Seeds) (१००% केंद्र हिस्सा):-**

प्रमाणित बियाणे उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी, बिजोत्पादकांना पायाभूत बियाण्यांचे वितरणावर ५०% अर्थसहाय्य उपलब्ध आहे .

अ) निकष व अटी-

१. पायाभूत बियाण्यांच्या खर्चावर ५०% अर्थसहाय्य हे राष्ट्रीय बीज निगम यांनी निश्चित केलेल्या दरानुसार किंवा कृषी व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार यांनी निश्चित केलेल्या दरानुसार (यापैकी जो कमी असेल) अनुज्ञेय राहील. सदर अर्थसहाय्य केवळ प्रमाणित बियाणे उत्पादनासाठी नव्याने अधिसूचित (≤ ८ वर्षे) सुधारीत/संकरित वाणांच्या पायाभूत बियाण्यांच्या वितरणासाठी बीजोत्पादकांना अनुज्ञेय राहील.

२. हरभरा,तूर,मुग,उडीद,गहू व ज्वारी ई. पिकांचे अधिसूचित सुधारीत/संकरित वाण या घटकांतर्गत अर्थसहाय्यास पात्र राहतील.

३. राष्ट्रीय बीज निगम यांनी पायाभूत बियाण्यांच्या खर्चावर प्राप्त केलेले अर्थसहाय्य संबंधित बियाणे उत्पादकांना (व्यक्ती किंवा संस्था) वितरित करणे आवश्यक राहील.

४. पायाभूत बियाणे-I किंवा पायाभूत बियाणे-II वितरणासाठी सदर अर्थसहाय्य केवळ एकदाच अनुज्ञेय राहील. जर एखाद्या संस्थेने मागील वर्षी त्याच वाणासाठी पायाभूत बियाणे-I वितरणावर अर्थसहाय्य घेतले असेल, तर त्या वाणासाठी या वर्षी पुनश्च लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

५. बियाणे उत्पादन हे तांत्रिक स्वरूपाचे असल्याने, एका बियाणे उत्पादकास जास्तीत जास्त ५ हेक्टर क्षेत्रापर्यंत पायाभूत बियाणे वितरणासाठी अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. संस्थेच्या बाबतीत ही मर्यादा एका हंगामात जास्तीत जास्त ५ हेक्टर /वाण/पीक इतकी राहील.

६. अर्थसहाय्य घेण्यात येणारी जमीन ही संबंधित बियाणे उत्पादकाच्या मालकीची किंवा वैध भाडेपट्ट्यावर असणे आवश्यक राहील.

७. त्याच बियाणे उत्पादकांना दरवर्षी पुनरावृत्तीने अर्थसहाय्य दिले जाणार नाही, याची खात्री राष्ट्रीय बीज निगम यांनी करावी. जास्तीत जास्त बियाणे उत्पादकांना या योजनेचा लाभ मिळेल याकडे विशेष लक्ष द्यावे.

८. एका हंगामात एका बियाणे उत्पादकास पैदासकार बियाणे व पायाभूत बियाणे वितरण या दोन्ही घटकांखाली एकाच वेळी अर्थसहाय्य अनुज्ञेय राहणार नाही.

९. या योजनेअंतर्गत पायाभूत ते प्रमाणित बियाणे उत्पादनाची संपूर्ण नोंद SATHI पोर्टल वर करणे अनिवार्य राहील.

१०. संबंधित शेतांमध्ये वितरित बियाण्यांची पेरणी झाल्याची नोंद कृषी मॅपर (Krishi Mapper) ॲपद्वारे करण्यात यावी.

ब) पीकनिहाय निर्धारित केलेले अनुदान मापदंड-

| अ. क्र. | पिकाचे नाव | पायाभूत बियाणे वितरण |
|---|---|---|
| १ | गहू | बियाणे रकमेच्या ५०% किंवा रु. २२००/-प्रति क्विंटल यापैकी जी कमी असेल ती रक्कम |
| २ | ज्वारी | बियाणे रकमेच्या ५०% किंवा रु. ३३००/-प्रति क्विंटल यापैकी जी कमी असेल ती रक्कम |

| | | |
|---|---|---|
| ३ | हरभरा,तूर मुग,उडीद | बियाणे रकमेच्या ५०% किंवा रु. ५५००/-प्रति क्विंटल यापैकी जी कमी असेल ती रक्कम |

**क) पायाभूत बियाणांवर अर्थसहाय्य - प्रस्तावित कार्यक्रम (सन २०२६-२७)-**

| अ. क्र. | हंगाम | पिकाचे नाव | क्षेत्र (हे.) | पायाभूत बियाणे वितरण लक्षांक (क्विं.) | आर्थिक तरतूद (रु.लाख) |
|---|---|---|---|---|---|
| १ | खरीप | तूर | १०००.०० | १००.०० | ५.५० |
| | | उडीद | १८७.५० | १५.०० | ०.८३ |
| | | मुग | ६२५.०० | ५०.०० | २.७५ |
| | **एकूण खरीप** | | **१८१२.५०** | **१६५.००** | **९.०८** |
| २ | रब्बी | हरभरा | १६१७.०० | १२१२.७३ | ६६.७० |
| | | गहू | १७५.०० | १७५.०० | ३.८५ |
| | | ज्वारी | १२५.०० | १०.०० | ०.३३ |
| | **एकूण रब्बी** | | **१९१७.००** | **१३९७.७३** | **७०.८८** |
| **एकूण (खरीप+ रब्बी)** | | | **३७२९.५०** | **१५६२.७३** | **७९.९६** |

**उपघटक अंमलबजावणीची कार्यपद्धती-**

१. राष्ट्रीय बीज निगम यांनी पेरणी हंगामापूर्वी सदर योजनेंतर्गत येणाऱ्या निर्देशित पिकांच्या ८ वर्ष किंवा ८ वर्षाच्या आतील अधिसूचित वाणांची वैशिष्ट्ये नमूद करून सदर बियाण्याचे वाणनिहाय दर व अनुदान याबाबतची व्यापक प्रसिद्धी द्यावी.

२. योजनेंतर्गत बिजोत्पादन कार्यक्रमाची नोंदणी बीज प्रमाणिकरण यंत्रणेंतर्गत साथी पोर्टलवर आवश्यक राहील.

३. राष्ट्रीय बीज निगम यांनी त्यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत पायाभूत बियाणे अनुदानावर उपलब्ध असल्याचा फलक लावावा. बियाण्याचे वाणनिहाय दर व अनुदान याची माहिती नोटीस बोर्डावर प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

४. राज्य शासनाने प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य (FCFS) धोरण स्विकारले असून राष्ट्रीय बीज निगम यांचेमार्फत SATHI पोर्टलवरील नोंदणीच्या आधारे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर पायाभूत बियाणे वितरण करण्यात येईल.

५. या उपघटकातील उपरोक्त मुद्दा क्र. "अ" व "ब" मध्ये विहित केलेल्या निकष व अटींचे अधीन राहून पात्र बिजोत्पादक शेतकरी/संस्थांना साथी प्रणालीवरून पायाभूत बियाणे वितरण करावे.

६. बिजोत्पादक शेतकरी/संस्थांनी उत्पादित झालेले बियाणे राष्ट्रीय बीज निगम यांना हस्तांतरित करणे बंधनकारक राहील.

७. उत्पादित बियाणे राष्ट्रीय बीज निगम यांना हस्तांतरित केल्यानंतर बिजोत्पादक शेतकरी / संस्थांनी प्रक्षेत्र व्यवस्थापक (Area Manager), राष्ट्रीय बीज निगम यांचेकडे अनुदान मागणी करावी.

८. प्रक्षेत्र व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम यांनी अनुदान मागणीसाठी प्राप्त झालेली शेतकरी/संस्थांची यादी जिल्हा बीज प्रमाणिकरण अधिकारी यांचेकडे पडताळणीसाठी पाठवावी.जिल्हा बीज प्रमाणिकरण अधिकारी यांनी सदर यादीची पडताळणी करून संबंधित शेतकरी/संस्थांनी बिजोत्पादन कार्यक्रम घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र राष्ट्रीय बीज निगम यांना द्यावे.

९. प्रक्षेत्र व्यवस्थापक (Area Manager), राष्ट्रीय बीज निगम यांनी जिल्हा बीज प्रमाणिकरण अधिकारी यांचेकडील बिजोत्पादन कार्यक्रम घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडून सविस्तर अनुदान मागणी प्रस्ताव विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, पुणे यांचेकडे सादर करावा.

१०.विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, पुणे यांनी जिल्हास्तरावरून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करून कृषी आयुक्तालयास एकत्रित अनुदान मागणी करावी.

११. कृषि आयुक्तालयास परिपूर्ण अनुदान मागणी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध निधीतून SNA SPARSH प्रणालीच्या माध्यमातून राष्ट्रीय बीज निगम, पुणे यांना अनुदान वितरीत करण्यात येईल.

१२. विभागीय व्यवस्थापक, राष्ट्रीय बीज निगम, पुणे यांनी कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडून प्राप्त झालेले अनुदान बिजोत्पादक शेतकरी/संस्थांना SNA SPARSH प्रणालीच्या माध्यमातून अदा करावे.

१३.प्रक्षेत्र व्यवस्थापक (Area Manager), राष्ट्रीय बीज निगम हे याबाबत जिल्हास्तरावर राष्ट्रीय बीज निगमतर्फे संपर्क अधिकारी राहतील. प्रक्षेत्र व्यवस्थापक (Area Manager) यांनी निवड केलेल्या बिजोत्पादक शेतकरी/संस्थांना बियाणे पुरवठा करण्याचे नियोजन करावे. याबाबतच्या सर्व आवश्यक नोंदी प्रक्षेत्र व्यवस्थापक (Area Manager) यांनी ठेवायच्या आहेत.

१४.केवळ साथी पोर्टलच्या माध्यमातून विक्री केलेले पायाभूत बियाणे अनुदानासाठी पात्र ठरणार आहे.

१५.सदर उपघटकांतर्गत बिजोत्पादक शेतकरी/संस्थांनी उत्कृष्टपणे राबविलेल्या कार्यक्रमाच्या यशोगाथा छापील/ डिजिटल स्वरुपात तयार करून आयुक्तालयास सादर कराव्यात.उपघटकांच्या अंमलबजावणीचे उत्कृष्ट फोटोग्राफ्स, व्हिडीओ क्लिप्स वेळोवेळी आयुक्तालयास सादर करणे बंधनकारक राहील.

१६.खरीप व रब्बी २०२६-२७ हंगामासाठीचा प्रस्तावित कार्यक्रम तसेच जिल्हानिहाय बियाणे वितरण लक्षांक "परिशिष्ठ अ" मध्ये सहपत्रीत करून देत आहे.

## १.२ प्रमाणिकरण शुल्कावरील अर्थसहाय्य (Assistance on Certification charges) (१००% केंद्र हिस्सा):-

- प्रमाणित बियाणे उत्पादनात वाढ करण्यासाठी बीजोत्पादक शेतकरी किंवा संस्थांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने बीज प्रमाणिकरण शुल्कावर अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.
- सदर घटकांतर्गत राष्ट्रीय बीज निगम यांच्या माध्यमातून बीजोत्पादक शेतकरी किंवा संस्थांनी भरलेल्या बीज प्रमाणिकरण शुल्काच्या ५०% पर्यंत अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.
- सदर अर्थसहाय्य प्रमाणित (Certified) बियाणे उत्पादनासाठी लागू राहील.
- बीजोत्पादक शेतकरी किंवा संस्थांच्या स्वतःच्या शेतावर घेतलेल्या बियाणे उत्पादनासाठी बीज प्रमाणिकरण शुल्कावर **कमाल ५०% किंवा जास्तीत जास्त रु. ४०० प्रती हेक्टर (यापैकी जे कमी असेल)** इतके अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.
- या घटकांतर्गत वितरित केलेल्या पायाभूत (Foundation) बियाण्यांवर बीज प्रमाणिकरण यंत्रणेद्वारे आकारण्यात आलेल्या प्रमाणिकरण शुल्कासाठीच अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील.

**प्रमाणिकरण शुल्कावरील अर्थसहाय्य (सन २०२६-२७) प्रस्तावित कार्यक्रम-**

| अ. क्र. | हंगाम | पिकाचे नाव | क्षेत्र (हे.) | पायाभूत बियाणे वितरण लक्षांक (क्विं.) | आर्थिक तरतूद (रु.लाख) रु.४००/- प्रति हे. |
|---|---|---|---|---|---|
| १ | खरीप | तूर | १०००.०० | १००.०० | ४.०० |
| | | उडीद | १८७.५० | १५.०० | ०.७५ |
| | | मुग | ६२५.०० | ५०.०० | २.५० |
| | **एकूण खरीप** | | **१८१२.५०** | **१६५.००** | **७.२५** |
| २ | रब्बी | हरभरा | १५२०.०० | ११४०.०० | ६.०८ |
| | | गहू | १७५.०० | १७५.०० | ०.७० |
| | | ज्वारी | १२५.०० | १०.०० | ०.५० |
| | **एकूण रब्बी** | | **१८२०.००** | **१३२५.००** | **७.२८** |
| **एकूण (खरीप+ रब्बी)** | | | **३६३२.५०** | **१४९०.००** | **१४.५३** |

## २. बियाणे पायाभूत सुविधा निर्मिती व आधुनिकीकरण (Creation & Modernization of Seed Infrastructure):- (१००% केंद्र हिस्सा)

बियाणे प्रक्रिया ही शेती क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून पारंपरिक पद्धतींपासून आधुनिक तंत्रज्ञानाकडे झालेल्या प्रगतीमुळे बियाण्यांतील अशुद्धी दूर करून उच्च दर्जाचे व एकसमान बियाणे तयार करणे शक्य झाले आहे. या प्रक्रियेमुळे बियाण्यांची उगवणक्षमता वाढते तसेच पीक उत्पादनात लक्षणीय वाढ होते. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नसुरक्षेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी बियाणे प्रक्रिया व साठवण सुविधा सुदृढ करणे अत्यावश्यक आहे. कापणीनंतर बियाण्यांचे योग्य प्रकारे वाळवणे, स्वच्छता करणे, ग्रेडिंग करणे व प्रक्रिया करणे यामुळे बियाण्यांची गुणवत्ता, टिकाऊपणा व सशक्तता वाढते. याच अनुषंगाने शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावीत यासाठी बियाणे प्रक्रिया व साठवण सुविधा उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### २.१ बीज प्रक्रिया प्रकल्प स्थापनेसाठी अर्थसहाय्य- (Assistance for Seed Processing Plant (SPP) and related Infrastructure) :-

सदर घटकांतर्गत अत्याधुनिक व उच्च तंत्रज्ञानयुक्त बीज प्रक्रिया प्रकल्प (Seed Processing Plant) उभारण्यासाठी तसेच आवश्यक यंत्रसामग्रीसाठी केंद्र शासनाकडून १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध आहे. १००० ते ५००० मेट्रिक टन क्षमतेच्या प्रकल्पांसाठी प्रत्यक्ष खर्च किंवा कमाल रु. ७५ लाख ते रु. १५० लाख (जे कमी असेल ते) इतके अर्थसहाय्य देण्यात येते. याचबरोबर बीज प्रक्रिया प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या इमारती, रिसिव्हिंग शेड व ड्रायिंग प्लॅटफॉर्म यांच्या बांधकामासाठी देखील १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध असून, त्यासाठी प्रत्यक्ष खर्च किंवा कमाल रु. १३२ लाख ते रु. ३१० लाख (जे कमी असेल ते) इतकी मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे.

**बीज प्रक्रिया प्रकल्प व पूरक यंत्रसामग्रीसाठी अर्थसहाय्य प्रस्तावित कार्यक्रम**

**(Assistance for Seed Processing Plant (SPP) & Supporting Machinery)**

| अ. क्र. | किमान वार्षिक क्षमता (मे.टन) | किमान वार्षिक क्षमता (टी.पी.एच.) | SPP यंत्रसामग्री/ उपकरणांचा खर्च | सहाय्यक यंत्रसामग्री/ उपकरणांचा खर्च | SPP संख्या | एकूण खर्च (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५००० | १० | ९९ | ५१ | १ | १५० | म.फु.कृ.वि.राहुरी |
| २ | १००० | २ | ५० | २५ | १ | ७५ | डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| **एकूण** | | | | | **२** | **२२५** | |

**इमारत, रिसिव्हिंग शेड व ड्रायिंग प्लॅटफॉर्म उभारण्यासाठी अर्थसहाय्य प्रस्तावित कार्यक्रम**

**(Assistance for Plant Buildings, Receiving Shed & Drying Platform)**

| अ. क्र. | प्रकल्पाची वार्षिक क्षमता (मे.टन) | इमारत व रिसिव्हिंग शेड (Plant Building & Receiving Shed) | | | | ड्रायिंग प्लॅटफॉर्म (Drying Platform) | | | | एकूण खर्च (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आकार (चौ.मी.) | दर (प्रती चौ.मी.) | PB व RS संख्या | एकूण खर्च (रु.लाख) | आकार (चौ.मी.) | दर (प्रती चौ.मी.) | DP संख्या | एकूण खर्च (रु.लाख) | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११=(६+१०) | १२ |
| १ | ५००० | १००० | २८००० | १ | २८० | ५०० | ६००० | १ | ३० | ३१० | म.फु.कृ.वि. राहुरी |
| २ | २००० | ५२५ | २८००० | १ | १४७ | २०० | ६००० | २ | २४ | १७१ | डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला |
| **एकूण** | | | | २ | ४२७ | | | ३ | ५४ | ४८१ | |

### २.२ बियाणे साठवण गोदामे (Seed Storage Godowns) -

बियाण्यांची गुणवत्ता दीर्घकाळ टिकवून ठेवण्यासाठी आधुनिक बियाणे साठवण गोदामांची उभारणी अत्यंत आवश्यक आहे. या उद्देशाने १००० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदामासाठी केंद्र शासनाकडून १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध असून, त्यासाठी प्रत्यक्ष खर्च किंवा रु. १९६ लाख ते रु. २४५ लाख (गोदामाच्या

प्रकारानुसार) इतकी कमाल मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. विविध क्षमतेच्या गोदामांसाठी अर्थसहाय्य प्रोराटा तत्त्वावर देण्यात येईल व त्यानुसार गोदामाचे क्षेत्रफळ व मोजमापे समायोजित करणे आवश्यक राहील.

**अटी-**

१. मंजूर अर्थसहाय्यापेक्षा अधिक होणारा खर्च संबंधित अंमलबजावणी संस्थेने स्वतः करणे आवश्यक राहील.

२. सदर घटकांतर्गत निर्माण करण्यात येणारी सर्व पायाभूत सुविधा SATHI पोर्टलवर नोंद करणे बंधनकारक राहील.

| अ. क्र. | गोडाऊन प्रकार | क्षमता (मे.टन) | किमान आकार (चौ.मी.) | दर (प्रती चौ.मी.) | साठवणूक गोडाऊन संख्या | एकूण खर्च (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| i. | Sheet Type Roof (with AC/GI sheets) | १००० | ७०० | २८००० | १ | १९६.०० | म.फु.कृ.वि.राहुरी |
| | | १००० | ७०० | २८००० | २ | ३९२.०० | डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| ii. | Ventilated Flat Roof | १००० | ७०० | ३५००० | २ | ४९०.०० | म.फु.कृ.वि.राहुरी -१<br>डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला- १ |
| | **एकूण** | | | | ५ | **१०७८.००** | |

### ३. बियाणे गुणवत्ता नियंत्रण घटकांचे बळकटीकरण (Strengthening of Seed quality control components):-

बियाण्यांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी देशामध्ये प्रभावी बियाणे गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा उभारणे अत्यावश्यक आहे. या उपघटकांतर्गत बियाणे गुणवत्ता नियंत्रण व्यवस्थेची निर्मिती व बळकटीकरण, पारंपरिक पद्धतीद्वारे आनुवंशिक शुद्धता तपासणीसाठी अर्थसहाय्य, क्षमता बांधणी, बियाणे कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी अर्थसहाय्य आणि डिजिटायझेशन तसेच ट्रेसेबिलिटी सुविधा उभारणी व बळकटीकरण करणे इ.बाबींसाठी अर्थसहाय्य उपलब्ध आहे.

#### ३.१. बियाणे गुणवत्ता नियंत्रण व्यवस्थेची निर्मिती व बळकटीकरण:-

या उपघटकांतर्गत नवीन बीज परीक्षण प्रयोगशाळा (Seed Testing Laboratory) स्थापन करण्यासाठी तसेच विद्यमान प्रयोगशाळांचे नूतनीकरण करण्यासाठी केंद्र शासनाकडून १०० टक्के आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. यामध्ये उपकरणे खरेदीसाठी कमाल रु. १२० लाख पर्यंत तर नूतनीकरण अंतर्गत २०० चौ.मी. पर्यंत क्षेत्राच्या प्रयोगशाळेसाठी कमाल रु. ५० लाख पर्यंत अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. या नूतनीकरणात बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा व इतर कामांचा समावेश राहील.

**निकष व अटी-**

१. बीज परीक्षण प्रयोगशाळांनी NABL ची मान्यता घ्यावी.

२. बीज परीक्षण प्रयोगशाळा अधिसूचित केलेली असावी, नसेल तर अनुदान प्राप्तीनंतर पुढील दोन वर्षांत पूर्तता करणे आवश्यक आहे.

३. बीज परीक्षण प्रयोगशाळांचे (STL) मॅपिंग SATHI पोर्टलवर केलेले असावे.

**३.१.१. बीज परीक्षण प्रयोगशाळांसाठी उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य-**

कृषी आयुक्तालय, पुणे यांचे अखत्यारीतील बीज परीक्षण प्रयोगशाळा पुणे, नागपूर व परभणी यांना अनुकमे रक्कम रु. ६२.९४ लाख, रु. १९.२८ लाख व रु. १४.५७ लाख याप्रमाणे एकूण रक्कम रु. ९६.७९ लाख उपकरणे खरेदीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**३.१.२. विद्यमान बीज परीक्षण प्रयोगशाळांचे बळकटीकरण-**

२०० चौरस मीटरपर्यंत क्षेत्रफळ असलेल्या बीज परीक्षण प्रयोगशाळेच्या नूतनीकरणासाठी एकूण खर्च रुपये ५०.०० लाख किंवा प्रत्यक्ष खर्च (यापैकी जे कमी असेल तेवढा) इतका अनुज्ञेय राहील.

सदर उपघटकांतर्गत बीज परीक्षण प्रयोगशाळा नागपूर व परभणी यांना अनुकमे रक्कम रु. २१.०० लाख व रु. ४.०० लाख याप्रमाणे एकूण रक्कम रु. २५.०० लाख बीज परीक्षण प्रयोगशाळेच्या नूतनीकरणासाठी मान्यता देण्यात येत आहे.

**३.२. पारंपरिक पद्धतीद्वारे आनुवंशिक शुद्धता तपासणीसाठी अर्थसहाय्य:**

**३.२.१.आनुवंशिक शुद्धता चाचणी सुविधा बळकटीकरण (Strengthening of Grow-Out Test Farm):-**

पारंपरिक पद्धतीने जनुकीय शुद्धता तपासणीच्या अनुषंगाने Grow-out Test Farms बळकटीकरण करण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध असून, २ हेक्टर व ५ हेक्टर क्षेत्रासाठी अनुक्रमे रु. ५० लाख व रु. १०० लाख पर्यंत आर्थिक सहाय्य दिले जाते. या अंतर्गत बांधकामे, सिंचन सुविधा, उपकरणे, यंत्रसामग्री, ट्रॅक्टर व इतर आवश्यक साधन सामुग्रीचा समावेश होतो.

सदर उपघटकांतर्गत ५ हेक्टर क्षेत्राच्या Grow-out Test Farms बळकटीकरण करण्यासाठी डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला यांना खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.

- ५.०० हेक्टरसाठी रु. १००.०० लाख किंवा प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चाची रक्कम यापैकी जी कमी असेल तेवढे अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.
- जमीन खरेदीसाठी निधी अनुज्ञेय नाही.
- शेताच्या आकारानुसार प्रोराटा आधारावर अर्थसहाय्य देय राहील.
- या उपघटकांतर्गत पुढील बाबींचा समावेश करण्यात आला आहे-

(अ) केंद्राच्या एकत्रित विकासासाठी आवश्यक बांधकामे /शेड, गोदामे, पंप हाऊस, वर्कशॉप, रस्ते, कुंपण, विद्युतीकरण, खळे बांधकाम, मळणीसाठीचे बांधकाम इत्यादींची उभारणी.

(ब) सिंचन/निचऱ्याची संरचना, पाइपलाइन, पाण्याच्या टाक्या, स्लॅब चॅनेल्स इत्यादींचा विकास.

(क) जमीन विकास, समतलीकरण, मॅपिंग, भूप्रदेश समायोजन, बांधणी, भूखंड आराखडा तयार करणे इत्यादी.

(ड) मोल्ड बोर्ड नांगर, डिस्क हॅरो, टिलर्स, लेव्हलर्स, रिगर, बंड फॉर्मर व इतर शेती अवजारे/यंत्रसामग्री, देखभाल व दुरुस्तीच्या आवश्यक साधनांसह ट्रॉली, ट्रॅक्टर ३५ HP-१ इत्यादी

(ई) क्षेत्रभेटीसाठी वाहतूक सुविधा

- घटकनिहाय तपशील - **परिशिष्ट - ब** मध्ये पहावा

**३.३. क्षमता बांधणी, Capacity Building (१००% केंद्र शासन) :-**

- देशातील बियाणे समुदाय मजबूत करण्यासाठी कुशल मनुष्यबळ आवश्यक आहे. यासाठी प्रगत तंत्रज्ञानांचे प्रशिक्षण, आधुनिक उपकरणांची हाताळणी, बीज परीक्षण पद्धती, बीज प्रमाणिकरण पद्धती आणि इतर संबंधित कार्यांची माहिती असणे आवश्यक आहे. विविध क्रियांमध्ये सहभागी असलेल्या तांत्रिक अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना नियमितपणे त्यांचे तांत्रिक ज्ञान/कौशल्य अद्ययावत करणे आवश्यक आहे.
- बीज प्रमाणिकरण, उत्पादन, परीक्षण, वितरण आणि इतर बियाणांशी संबंधित कामात कार्यरत असलेल्या तांत्रिक अधिकारी/कर्मचाऱ्यांकरीता १० एकदिवसीय प्रशिक्षणासाठी (प्रत्येकी १०० प्रशिक्षणार्थी) एकूण रक्कम रु. १०.०० लाख अर्थसहाय्य उपलब्ध आहे.

**निकष** -

अ) प्रशिक्षणार्थींची संख्या आणि प्रशिक्षण कालावधी हा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थेच्या गरजेनुसार ठरवण्यात येईल.

आ) प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिवस रुपये १०००/- किंवा प्रत्यक्ष खर्च (जे कमी असेल) याप्रमाणे अर्थसहाय्य देय राहील

इ) आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाचे तपशील व स्थळ -**कृषी मॅपर** ॲपवर नोंदविले जावे.

**३.४.बियाणे कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी अर्थसहाय्य - Assistance for Strengthening of Seed Law Enforcement (१००% केंद्र शासन) :-**

बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी माहिती पुस्तिका व पत्रके (pamphlets) छपाई व वितरणासाठी रु. ५.०० लाख किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय राहील.

**३.५. डिजिटायझेशन तसेच ट्रेसेबिलिटी सुविधा उभारणी व बळकटीकरण करणे (Development & Stregthening of Digital Facilities):-**

- बियाणे क्षेत्रात माहितीचा प्रभावी प्रसार व्हावा आणि ती सहज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने डिजिटलायझेशन सुविधांची उभारणी करणे आवश्यक आहे. यामुळे या क्षेत्रातील 'व्यवसाय सुलभीकरण' (Ease of Doing Business) प्रक्रियेला चालना मिळणार आहे.
- या उपक्रमांतर्गत प्रामुख्याने कार्यालयीन ऑटोमेशन, संगणकीकरण, माहिती प्रणाली आणि दळणवळण सुविधांचा विकास करण्यात येईल. तसेच, बियाण्यांच्या शोधक्षमतेसाठी (Traceability) आवश्यक असणारी उपकरणे, जसे की विशेष प्रिंटर, स्कॅनर, कॅमेरा आणि OECD प्रमाणिकरण टॅगसह इतर टॅग छपाईसाठी लागणारी मशीनरी खरेदी करण्यावर अर्थसहाय्य देय राहील.

- डिजिटायझेशन तसेच ट्रेसेबिलिटी सुविधा उभारणे व बळकटीकरण करण्यासाठी डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला यांना रु.१७.०० लाख निधीस मंजुरी देण्यात येत आहे.

**४. राष्ट्रीय बियाणे राखीव (National Seed Reserve) (१००% केंद्र हिस्सा) -**

- बियाणे तुटवडा किंवा नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे प्रमाणित व पायाभूत बियाणे वेळेवर उपलब्ध करून देणे हा राष्ट्रीय बियाणे राखीव साठ्याचा मुख्य उद्देश आहे.
- संपूर्ण देशामध्ये विविध शासकीय संस्थांमार्फत बियाणे राखीव साठ्याचे व्यवस्थापन करण्यात येते, जेणेकरून नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य आपत्कालीन परिस्थितींमध्ये प्रभावित क्षेत्रांमध्ये बियाणांचा त्वरित पुरवठा करता येईल आणि त्यामुळे कृषी क्षेत्राची पुनर्बांधणी व अन्नसुरक्षा सुनिश्चित करता येईल.

**४.१. राखीव बियाण्यांच्या देखभालीचा खर्च (Maintenance Cost) :-**

यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो:-

i. प्रक्रिया शुल्क, पॅकिंग साहित्य, मजुरी, प्रमाणिकरण शुल्क - ₹३००/क्विंटल किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय राहील.

ii. साठवणूक केंद्रापर्यंतचा वाहतूक खर्च, लोडिंग/अनलोडिंग व हाताळणी खर्च - ₹२००/क्विंटल किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय राहील.

iii. गोदामाच्या ठिकाणी फ्युमिगेशन, फवारणी, धूळमुक्त वातावरण व देखभाल खर्च - ₹१०/क्विंटल किंवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य देय राहील.

**निकष व अटी:**

i. खरीप हंगाम - १५ ऑगस्टपर्यंत NSR मध्ये बियाणे ठेवले जाईल; त्यानंतर संस्थांना विक्री करता येईल.

ii. रब्बी हंगाम- १५ डिसेंबरपर्यंत NSR मध्ये बियाणे ठेवले जाईल; त्यानंतर संस्थांना विक्री करता येईल.

iii. NSR मध्ये साठवले जाणारे बियाणे हे SATHI प्रणालीद्वारेच उत्पादित केलेले असावे.

iv. केवळ प्रमाणित व पायाभूत बियाणेच पात्र असतील - लघु व मध्यम कालावधीचे: तृणधान्य, भरडधान्य, पौष्टिक तृणधान्य, कडधान्य, तेलबिया, तंतू व चारा पिके इ.

v. बियाणे उत्पादन प्रणाली योग्य पिढीनुसार पार पाडलेली असावी व शासकीय/ नोंदणीकृत उत्पादकांकडून उत्पादन होणे आवश्यक आहे.

vi. मागील वर्षी राज्याने दाखवलेल्या उपलब्धतेच्या केवळ १% बियाणे NSR मध्ये ठेवता येईल.

vii. केंद्र शासनाच्या बियाणे विभागाकडून लक्षांक MIS वर अपलोड केले जातील. अंमलबजावणी संस्थेने प्रत्यक्ष साठ्याचे तपशील, स्थानाचे GPS कोऑर्डिनेट्स व छायाचित्रे अपलोड करावीत. बियाणांची विक्री कशी केली याची माहितीही MIS वर द्यावी लागेल.

राखीव बियाण्यांच्या देखभालीचा पीकनिहाय लक्षांक - **परिशिष्ट - क** मध्ये पहावा.

**५. प्रशासकीय ,सनियंत्रण व मूल्यमापन खर्च-**

प्रशासकीय, सनियंत्रण व मूल्यमापन बाबीसाठी एकूण खर्चाच्या २.५ % निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**(सुनिल बोरकर)**
**कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण),**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत-

१. संचालक, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणिकरण यंत्रणा अकोला
२. श्री.सुहास सकपाळ कक्ष अधिकारी डेस्क १ ए कृषी व पदुम विभाग मंत्रालय, मुंबई
३. कृषी उपसंचालक, (मा.आयुक्त कृषी कक्ष), कृषी आयुक्तालय, पुणे
४. कृषि उपसंचालक (नियोजन ), कृषि आयुक्तालय, पुणे

# कृषि उन्नती योजना -राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान अंतर्गत बियाणे घटक (पुर्वीची SMSP) वार्षिक कृती आराखडा सन २०२६-२७

| अ.क्र. | उपघटकाचे नाव | रक्कम (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | बियाण्यांच्या नवीन जातींना प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य (Assistance for Fostering Seeds of New Varieties) | | |
| १.१ | पायाभूत बियाणांवर अर्थसहाय्य (Assistance on Foundation Seeds) | ७९.९६ | राष्ट्रीय बीज निगम |
| १.२ | प्रमाणीकरण शुल्कावरील अर्थसहाय्य (Assistance on Certification Charges) | १४.५३ | राष्ट्रीय बीज निगम |
| | **एकूण (१)** | **९४.४९** | |
| २ | बियाणे पायाभूत सुविधा निर्मिती व आधुनिकीकरण (Creation & Modernization of Seed Infrastructure) | | |
| २.१ | बीज प्रक्रिया प्रकल्प स्थापनेसाठी अर्थसहाय्य- (Assistance for Seed Processing Plant (SPP) and related Infrastructure) | | |
| | बीज प्रक्रिया प्रकल्प व पूरक यंत्रसामग्रीसाठी अर्थसहाय्य (Assistance for Seed Processing Plant (SPP) & Supporting Machinery) | २२५.०० | म.फु.कृ.वि. राहुरी व डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| | इमारत, रिसिव्हिंग शेड व ड्रायिंग प्लॅटफॉर्म उभारण्यासाठी अर्थसहाय्य (Assistance for Plant Building, Receiving Shed & Drying Platform) | ४८१.०० | म.फु.कृ.वि. राहुरी व डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| २.२ | बियाणे साठवण गोदामे उभारणीसाठी अर्थसहाय्य (Assistance for Seed Storage Godowns) | | |
| | Sheet Type Roof (with AC/GI sheets) | ५८८.०० | म.फु.कृ.वि. राहुरी व डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| | Ventilated Flat Roof | ४९०.०० | म.फु.कृ.वि. राहुरी व डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| | **एकूण (२)** | **१७८४.००** | |
| ३ | बियाणे गुणवत्ता नियंत्रण घटकांचे बळकटीकरण (Strengthening of Seed Quality Control Components) | | |
| ३.१ | बियाणे गुणवत्ता नियंत्रण व्यवस्थेची निर्मिती व बळकटीकरण (Creation/Strengthning of Seed Quality Control) | | |
| ३.१.१ | बीज परीक्षण प्रयोगशाळांसाठी उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य (Purchase of Equipment for seed testing Laboratories) | ९६.७९ | कृषी आयुक्तालय, पुणे |
| ३.१.२ | विद्यमान बीज परीक्षण प्रयोगशाळांचे बळकटीकरणासाठी अर्थसहाय्य (Renovation of existing Seed testing | २५.०० | कृषी आयुक्तालय, पुणे |

| अ.क्र. | उपघटकाचे नाव | रक्कम (रु. लाख) | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|
| | Laboratories) | | |
| ३.२ | पारंपारिक पद्धतीद्वारे शुद्धता तपासणीसाठी अर्थसहाय्य (Development /Strengthening of conventional Genetic Purity Testing) | | |
| ३.२.१ | आनुवंशिक शुद्धता चाचणी सुविधा बळकटीकरण (Strengthening Grow Out Test Farm) | १००.०० | डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| ३.३ | क्षमता बांधणी (Capacity Building) | १०.०० | कृषी आयुक्तालय, पुणे |
| ३.४ | बियाणे कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी अर्थसहाय्य (Assistance for strengthening of Seed Law Enforcement) | ५.०० | कृषी आयुक्तालय, पुणे |
| ३.५ | डिजिटायझेशन व ट्रेसेबिलिटी सुविधा उभारणी व बळकटीकरण करणे (Development & Strengthening of Digital Facilities) | १७.०० | डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला |
| **एकूण (३)** | | **२५३.७९** | |
| ४ | राष्ट्रीय बियाणे राखीव (National Seed Reserve) | | |
| ४.१ | राखीव बियाण्यांच्या देखभालीचा खर्च (Maintenance Cost) | ९६.२४ | महाबीज, अकोला |
| | **एकूण (४)** | **९६.२४** | |
| ५ | प्रशासकीय, संनियंत्रण व मूल्यमापन खर्च | **५४.११** | |
| **अ** | **एकूण (१+२+३+४+५)** | **२२८२.६३** | |
| **ब** | प्रलंबित दायित्व (सन २०२५-२६) | **२१२.३१** | |
| **एकुणात एकुण (अ+ब)** | | **२४९४.९४** | |

(सुनिल बोरकर)
कृषि संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण),
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

# परिशिष्ट- अ १

## पायाभूत बियाणांवर अर्थसहाय्य - प्रस्तावित कार्यक्रम

| अ. क्र. | जिल्हा | पायाभूत बियाणे वितरण लक्षांक | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तूर | | उडीद | | मूग | | | |
| | | भौतिक (क्विं.) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक (क्विं.) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक (क्विं.) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक (क्विं.) | आर्थिक (रु.लाख) |
| खरीप २०२६-२७ हंगाम | | | | | | | | | |
| १ | यवतमाळ | ३० | १.६५ | | | | | ३० | १.६५ |
| २ | जळगाव | ५ | ०.२८ | १५ | ०.८३ | ५० | ३ | ७० | ३.८५ |
| ३ | छ.संभाजीनगर | ५ | ०.२८ | | | | | ५ | ०.२८ |
| ४ | वाशीम | १० | ०.५५ | | | | | १० | ०.५५ |
| ५ | अमरावती | १० | ०.५५ | | | | | १० | ०.५५ |
| ६ | अकोला | ५ | ०.२८ | | | | | ५ | ०.२८ |
| ७ | जालना | ५ | ०.२८ | | | | | ५ | ०.२८ |
| ८ | बुलढाणा | ३० | १.६५ | | | | | ३० | १.६५ |
| एकूण | | १०० | ५.५० | १५ | ०.८३ | ५० | २.७५ | १६५ | ९.०८ |

| अ. क्र. | जिल्हा | हरभरा | | गहू | | ज्वारी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रब्बी २०२६-२७ हंगाम | | | | | | | | | |
| | | भौतिक (क्विं.) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक (क्विं.) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक (क्विं.) | आर्थिक (रु.लाख) | भौतिक (क्विं.) | आर्थिक (रु.लाख) |
| १ | अमरावती | १०० | ५.५० | १० | ०.२२ | | | ११०.०० | ५.७२ |
| २ | यवतमाळ | २५० | १३.७५ | २० | ०.४४ | | ०.०० | २७०.०० | १४.१९ |
| ३ | वाशीम | १०० | ५.५० | १० | ०.२२ | | ०.०० | ११०.०० | ५.७२ |
| ४ | अकोला | ५० | २.७५ | १० | ०.२२ | | | ६०.०० | २.९७ |
| ५ | बुलढाणा | २५० | १३.७५ | ४० | ०.८८ | १ | ०.०३ | २९१.०० | १४.६६ |
| ६ | जालना | २० | १.१० | | | | | २०.०० | १.१० |
| ७ | छ.संभाजीनगर | १० | ०.५५ | | | | | १०.०० | ०.५५ |
| ८ | जळगाव | ३०० | १६.५० | ८५ | १.८७ | ७ | ०.२३ | ३९२.०० | १८.६० |
| ९ | परभणी | ५० | २.७५ | | | २ | ०.०७ | ५२.०० | २.८२ |
| १० | लातूर | ५० | २.७५ | | | | | ५०.०० | २.७५ |
| ११ | नांदेड | ३२.७३ | १.८० | | | | | ३२.७३ | १.८० |
| एकूण | | १२१२.७३ | ६६.७० | १७५.०० | ३.८५ | १०.०० | ०.३३ | १३९७.७३ | ७०.८८ |

# परिशिष्ट- अ २

## प्रमाणिकरण शुल्कावरील अर्थसहाय्य- प्रस्तावित कार्यक्रम

| अ. क्र. | जिल्हा | प्रमाणिकरण शुल्कावरील अर्थसहाय्य (रु.४००/- प्रति.हे.) | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तूर | | उडीद | | मूग | | | |
| | | क्षेत्र (हे.) | आर्थिक (रु.लाख) | क्षेत्र (हे.) | आर्थिक (रु.लाख) | क्षेत्र (हे.) | आर्थिक (रु.लाख) | क्षेत्र (हे.) | आर्थिक (रु.लाख) |
| खरीप २०२६-२७ हंगाम | | | | | | | | | |
| १ | यवतमाळ | ३०० | १.२० | | | | | ३००.०० | १.२० |
| २ | जळगाव | ५० | ०.२० | १८७.५ | ०.७५ | ६२५ | २.५ | ८६२.५० | ३.४५ |
| ३ | छ.संभाजीनगर | ५० | ०.२० | | | | | ५०.०० | ०.२० |
| ४ | वाशीम | १०० | ०.४० | | | | | १००.०० | ०.४० |
| ५ | अमरावती | १०० | ०.४० | | | | | १००.०० | ०.४० |
| ६ | अकोला | ५० | ०.२० | | | | | ५०.०० | ०.२० |
| ७ | जालना | ५० | ०.२० | | | | | ५०.०० | ०.२० |
| ८ | बुलढाणा | ३०० | १.२० | | | | | ३००.०० | १.२० |
| एकूण | | १००० | ४.०० | १८७.५ | ०.७५ | ६२५ | २.५ | १८१२.५ | ७.२५ |

रब्बी २०२६-२७ हंगाम

| अ. क्र. | जिल्हा | हरभरा | | गहू | | ज्वारी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र (हे.) | आर्थिक (रु.लाख) | क्षेत्र (हे.) | आर्थिक (रु.लाख) | क्षेत्र (हे.) | आर्थिक (रु.लाख) | क्षेत्र (हे.) | आर्थिक (रु.लाख) |
| १ | अमरावती | १२५.०० | ०.५० | १०.०० | ०.०४ | | | १३५.०० | ०.५४ |
| २ | यवतमाळ | ३१२.५० | १.२५ | २०.०० | ०.०८ | | | ३३२.५० | १.३३ |
| ३ | वाशीम | १२५.०० | ०.५० | १०.०० | ०.०४ | | | १३५.०० | ०.५४ |
| ४ | अकोला | ६२.५० | ०.२५ | १०.०० | ०.०४ | | | ७२.५० | ०.२९ |
| ५ | बुलढाणा | ३१२.५० | १.२५ | ४०.०० | ०.१६ | १२.५० | ०.०५ | ३६५.०० | १.४६ |
| ६ | जालना | २५.०० | ०.१० | | | | | २५.०० | ०.१० |
| ७ | छ.संभाजीनगर | १२.५० | ०.०५ | | | | | १२.५० | ०.०५ |
| ८ | जळगाव | ३८०.०० | १.५२ | ८५.०० | ०.३४ | ८७.५० | ०.३५ | ५५२.५० | २.२१ |
| ९ | परभणी | ६२.५० | ०.२५ | | | २५.०० | ०.१० | ८७.५० | ०.३५ |
| १० | लातूर | ६२.५० | ०.२५ | | | | | ६२.५० | ०.२५ |
| ११ | नांदेड | ४०.०० | ०.१६ | | | | | ४०.०० | ०.१६ |
| एकूण | | १५२०.०० | ६.०८ | १७५.०० | ०.७० | १२५ | ०.५० | १८२० | ७.२८ |